डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपूरी,नांदेड
Dr.Shankarro Chavan Govt.Medical College & Hospital,Vishnupuri,Nanded.
Phone no.02462-229277 (A.O) Dean office -02462-229274 Email Id-gmcnanded@gmail.com /gmcnanded@rediffimail .com

जा.क्र.डॉशंचशावैमविनां/आस्था-३/कंत्राटी पदभरती/जाहिरात/ 6855 /२०२५ दिनांक:-25/07 /२०२५

# जाहिरात

वर्तमान शैक्षणिक सेवांतील मानव संसाधन विकास (HRDEMS) अंतर्गत केंद्र /राज्य /स्वायत्त /शैक्षणिक महाविद्यालय / संस्थेमध्ये कौशल्य केंद्र (Skill Lab Centre) स्थापन करण्याची योजना राबवली जात आहे. या केंद्रांमध्ये डॉक्टर, परिचारिका व पॅरामेडिकल यांच्यासाठी राष्ट्रीय वर्तमान जीवनरक्षक (NELS) या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कौशल्य आधारित प्रशिक्षण दिले जाते. या योजनेअंतर्गत, प्रत्येक NELS कौशल्य केंद्रात एक कोर्स समन्वयक (Course Coordinator) पदावर **दिनांक ३१ मार्च २०२६** पर्यंत नियुक्ती करण्यात येणार आहे.

सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत ईच्छुक पात्र उमेदवारांनी आपला विहीत नमुन्यामधील अर्ज शैक्षणिक अर्हतेनुसार, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे यांच्या साक्षांकित प्रतीसह डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड येथील बधिरीकरणशास्त्र विभाग येथे **दि.१/०८/२०२५** ते **दि.१२/०८/२०२५** पर्यंत सकाळी १० ते ५ या कालावधीमध्ये कार्यालयीन दिवशी सादर करावे. सदर पदासाठी प्राप्त झालेल्या आवेदनापत्रानुसार जे पात्र उमेदवार ठरतील त्या उमेदवारास ई-मेल संदेशाव्दारे व मोबाईलवर कळविण्यात येईल व त्यांची मुलाखत बधिरीकरणशास्त्र विभाग येथे **दि.१४ ऑगस्ट,२०२५ रोजी ,सकाळी ११.००** वाजता घेण्यात येवून पुढील निवड प्रक्रिया पार पाडली जाईल.

| अ.क्र | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १. | कौशल्य प्रयोगशाळा अभ्यासक्रम समन्वयक<br>**(Skill Lab Course Coordinator)** | ०१ | कोणत्याही आरोग्य किंवा संलग्न शाखेतील पदवीधर. बी.एस्सी./ GNM नर्सिंग प्राधान्य. |

पात्रता :-

१) किमान शैक्षणिक अर्हताकोणत्याही आरोग्य किंवा संलग्न शाखेतील पदवीधर, बी.एस्सी./GNM नर्सिंग प्राधान्य उमेदारास प्राधान्य देण्यात येईल.

२) तसेच राष्ट्रीय / राज्य आरोग्य कार्यक्रमांतर्गत विविध BLS/ALS प्रणिक्षणाअंतर्गत वैद्यकीय कर्मचाऱ्यांसाठी जीवनरक्षक कौशल्यांवरील प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्याचा अनुभव असणा-या उमेदारास प्राधान्य देण्यात येईल.

३) राष्ट्रीय / राज्य आरोग्य कार्यक्रमांतर्गत विविध BLS/ALS प्रशिक्षणाअंतर्गत वैद्यकीय कर्मचाऱ्यांसाठी जीवनरक्षक कौशल्यांच्या प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणाऱ्या जागा, उपकरणे व उपभोग्य वस्तूंचे देखभाल व व्यवस्थापन करण्याचा अनुभव असणा-या उमेदारास प्राधान्य देण्यात येईल.

**नोकरीचे स्वरुप (Job Description):-**

१)NELS प्रशिक्षणाचे नियोजन व अंमलबजावणीसाठी संस्थास्तरावर नियुक्तकेलेल्या NELS नोडल अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य केंद्रात प्रशिक्षण दिनदर्शीका तयार करणे, प्रशिक्षण कार्यशाळांसाठी लागणाऱ्या सर्व लॉजिस्टिक व इतर आवश्यक व्यवस्थेसंबंधीचे कामकाजवेळोवेळी करणे.

२) सामग्री / उपकरणे यांचे व्यवस्थापन देखभाल व साठ्याचे व्यवस्थापन करणे NELS कौशल्य केंद्रातील उपकरणे,उपभोग्य वस्तू इत्यादींचे नियमित देखभाल व साठा यांचे व्यवस्थापन करणे.

३) बिल व दावा प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षणार्थींनी सादर केलेल्या बिलांचे व इतर मान्य दाव्यांचे संकलन, पडताळणी व वितरण हे वैद्यकीय महाविद्यालयस्तरावर नियुक्त केलेले NELS चे नोडल अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करावे.

४) कामकाजासंबंधीचा त्रैमासिक प्रगती अहवाल वेळोवेळी तयार करणे त्यामध्ये शारीरिक व आर्थिक प्रगती दर्शविणा-या मुद्दांच्या अनुषंगाने तयार करुन NELS चे नोडलअधिकारी यांना वेळोवेळी सादर करणे.

५) इतर कौशल्य केंद्राशी संबंधित कामकाज महाविद्यालयस्तरावरील NELS चे नोडल अधिकाऱ्याच्या निर्देशानुसार वेळोवेळी इतर कौशल्य केंद्राशी संबंधित कार्ये पार पाडणे.

**वयोमर्यादा** :- किमान १८ वर्षे ते कमाज ३८ वर्षे इतकी राहिल.

**मानधन** :- रुपये ४०,०००/- प्रतिमहा ( अक्षरीचाळीसहजाररुपये फक्त ) इतके राहील.

**नियम व अटी :-**

१) उमेदवाराचे कामकाज हे समानधारक नसल्यास, कर्तव्यावरील अनियमितता व गैरवर्तणुक या कारणासाठी देण्यात आलेली नियुक्ती कोणत्याही ही कोणत्याही पुर्वसुचने शिवाय रद्द करण्यात येईल.

२) करार पध्दतीने नियुक्त केलेल्या उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार महाविद्यालयस्तरावरील NELS नोडल अधिकारी / अधिष्ठाता यांनी नेमुन दिलेली विवक्षित कामे सुध्दा वेळोवेळी पार पाडणे बंधनकारक राहिल.

३) पात्र उमेदवाराने मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

४) मुलाखतीस येताना उमेदवारांनी सर्व दस्तऐजांचे मुळकागदपत्रे यांचेसह दोन संच स्वसाक्षांकित करुन घेऊन येणे.

५) उमेदवारांने त्यांच्या निवडीसाठी समितीवर अथवा प्रशासनावर प्रत्यक्ष /अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास, तसे आढळून येणा-या उमेदवारास ह्या निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल.

६) कंत्राटीने पध्दतीने नियुक्त केलेल्या उमेदवार यांना सदर पदावर नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही तसेच सदर कालावधीमध्ये केलेल्या सेवा ह्या कोणत्याही प्रयोजनासाठी ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

*टिप :- सदर जाहिरातमध्ये आवश्यक ते बदल करणे किंवा कोणताही बदल करणे किंवा सदर पदाची जाहिरात पुर्णत: रद्द करणे यांचा अधिकार अधिष्ठाता यांचेकडे पुर्णत: राखून ठेवण्यात आलेला आहे.*

( डॉ.सुधीर भा.देशमुख )
अधिष्ठाता,
डॉ.शं.च.शा.वै.महा व रुग्णालय,विष्णुपूरी,नांदेड.

कौशल्य प्रयोगशाळा अभ्यासक्रम समन्वयक (**Skill Lab Course Coordinator**) कंत्राटी पदभरती
विहीत नमुना अर्ज

| वैयक्तिक माहिती | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **तपशील** | **माहिती** |
| १. | पूर्ण नाव ( मराठीत ) | |
| २. | पूर्ण नाव ( इंग्रजीत ) | |
| ३. | जन्मतारीख ( DD/MM/YYYY ) | |
| ४. | वय ( अर्जाच्या अंतिम तारखेनुसार ) | |
| ५. | लिंग: पुरुष / स्त्री / इतर | |
| ६. | वैवाहिक स्थिती विवाहीत/ अविवाहीत | |
| ७. | राष्ट्रीयत्व | |
| ८. | आधार क्रमांक | |

| संपर्क माहिती | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **तपशील** | **माहिती** |
| १. | कायमचा पत्ता | |
| २. | सध्याचा पत्ता | |
| ३. | मोबाईल क्रमांक | |
| ४. | ई-मेल आयडी | |

| शैक्षणिक पात्रता | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **परीक्षा / पदवी** | **बोर्ड / विद्यापीठ वर्षे गुण ( %) श्रेणीसह** |
| १. | १० वी | |
| २. | १२ वी | |
| ३. | पदवी / पदव्युत्तर | |
| ४. | संगणकीय कौशल्ये/ इतर विशेष प्राविण्ये | |

| अनुभव | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **संस्था / रुग्णालयाचे नाव** | **तपशिल** |
| | | |

( उमेदवाराचे संपूर्ण नाव व सही )